




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार १० डिसेंबर २०२४ | अंक ३६६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर


# भाजप आमदाराच्या मामाचं सकाळी अपहरण, नंतर खून

## पुण्यातील विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचा अपहरणानंतर मृतदेह सापडला आहे





पुण्यातून एक अतिशय धक्कादायक बातमी समोर आली आहे. पुण्यातील विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ हे मृतावस्थेत सापडले आहेत. सतीश वाघ यांचं आज पहाटे अज्ञात आरोपींकडून अपहरण करण्यात आलं होतं. चारचाकी गाडीवरुन आलेल्या चार अज्ञात आरोपींनी त्यांना जबरदस्ती गाडीत टाकत त्यांचं अपहरण केलं होतं. संबंधित घटना ही पुण्यातील एका चौकात झाली होती. ही घटना सीसीटीव्हीतही कैद झाली होती. या घटनेचा थरारक व्हिडीओ देखील समोर आला होता. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली होती. आरोपी कोण होते? त्यांनी सतीश वाघ यांचं अपहरण का केलं? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. सतीश वाघ यांच्या अपहरणाची घटना ही आज सकाळच्या सुमारास घडली होती. सतीश वाघ हे सोलापूर रस्त्यावर असलेल्या ब्ल्यू बेरी हॉटेलबाहेर थांबले होते. यावेळी अचानक शेवरलेट एन्जॉय ही गाडी आली. या गाडीतून दोन अज्ञात आरोपी बाहेर आले. त्यांनी आधी सतीश वाघ यांच्याशी बातचित करण्याचं नाटक केलं. त्यांनी सतीश वाघ यांना काहीतरी विचारपूस करण्याचं नाटक केल्याची शक्यता आहे. त्यानंतर त्यांनी बळजबरी सतीश वाघ यांना गाडीत बसवलं. यानंतर ते सतीश वाघ यांना

## माजलगावात कॅन्डल मार्च रॅली काढून बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



माजलगाव–प्रतिनिधी येथे भारती बौद्ध महासभा राष्ट्रीय संरक्षक आदरणीय महाउपासिका मीराताई आंबेडकर तालुका शाखा माजलगाव व गेल्या अनेक वर्षापासून समाजसेवेच्या कार्यात अग्रेसर असलेल्या क्रांतीसुर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानाच्या अथांग महासागरास अभिवादन करण्यासाठी६८ व्या महापरिनिर्वाणदिनी ६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी नऊ वाजता विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथून अभिवादन रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे नवीन बस स्टॅन्ड येथून केसापुरी कॅम्प येथील सांची बुद्ध विहार डॉक्टर आंबेडकर भवन येथे विसर्जित करून विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते त्यानंतर सायंकाळी सहा वाजता नवीन बस स्टॅन्ड माजलगाव येथून बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी भव्य अशी कॅन्डल मार्च रॅली काढण्यात आली होती. याप्रसंगी नवीन बस स्टॅन्ड येथे या कॅन्डल मार्च रॅलीचे माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पो.नि. राहुल सूर्यतळ साहेब यांनी मशाल प्रज्वलित करून उद्घाटन केले प्रसंगी क्रांतीसुर्य सेवाभावी संस्थेचे अशोक मगर प्रा. संजय बागुल पत्रकार किशन भदर्गे भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ.भागवत साळवे भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हाध्यक्ष व बीड जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस.बी मोरे,शामभाऊ वाघमारे,कृ.उ. बा. समितीचे माजी संचालक दीपक टाकणखार, वंचित बहुजन आघाडीचे भारत तांगडे,गुलाबराव धायजे, प्रा.एल आर मस्के, ऋषिकेश सोनवणे, प्रदीप साळवे सोनपसारे, अश्विन टाकणखार, सदानंद भैय्या प्रधान, नितीन साळवे शिशिर प्रधान सचिन टाकणखार, यांच्यासह शेकडो बौद्ध उपासक उपाशी का तरुण युवक विद्यार्थी सहभागी झाले होते या कॅन्डल मार्च रॅलीचे विसर्जन विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी बाबासाहेबांना अभिवादन करून समारोप करण्यात आला

## अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयातील रुग्णांच्या जीवाशी चाललेला खेळ थांबवा बोगस औषध पुरवठा प्रकरणाची एसआयटी चौकशी करुन दोषींना कठोर शिक्षा करा - राजेभाऊ फड

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे जवळपास तीन जिल्ह्यातील गोरगरीब जनतेसाठी जीवनदायी रुग्णालय आहे. दररोज हजारो रुग्णांवर येथे उपचार होतात. याच रुग्णालयात बोगस औषधाचा पुरवठा सुरू असल्याची बाब नुकतीच उघड झाली. याबाबत पोलिसांत गुन्हाही नोंद झालेला आहे. मात्र एवढ्यावर हे प्रकरण न थांबवता त्याच्या मुळाशी जाणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील प्रकरण हे गंभीर असून याची पाळेमुळे राज्यात इतर ठिकाणीही असू शकतात. प्रशासकीय यंत्रणेतील अनेक बड्या लोकांचे यात हात असण्याची दाट शक्यता आहे. म्हणून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात बोगस औषधांचा पुरवठा होत असल्याचे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. शासनाने नेमून दिलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधाचा पुरवठा केल्याचे अन्न आणि औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले. याबाबत अंबाजोगाई पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील बोगस औषध पुरवठा प्रकरणात गुजरात आणि ठाणे जिल्ह्याचे कनेक्शन असून ही टोळी राज्यात आणि आंतरराज्य सक्रिय असण्याची दाट शक्यता आहे. गोरगरीब रुग्णांच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. गोरगरीब रुग्णांना खाजगी दवाखान्यात उपचार घेणे परवडत नाही, त्यांच्यासाठी हे शासकीय रुग्णालये वरदान ठरतात. तिथे असे प्रकार उघडकीस होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शासकीय यंत्रणेत अशा स्वरूपाचा भ्रष्टाचार ही नक्कीच हादरविणारी बाब असून, यातील सर्व दोषींची सखोल चौकशी व्हावी आणि त्यांना कठोर शिक्षा करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. उच्चस्तरीय चौकशी करा स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बोगस औषधांचा पुरवठा होणे ही गंभीर आणि निंदनीय बाब आहे. या गैरप्रकारात अनेकांचा हात असण्याची शक्यता आहे. सदरील शासकीय औषध पुरवठा कंत्राटदाराला कुणाच्या शिफारशी नुसार कंत्राट देण्यात आले? कोणत्या मंत्र्याचा? कोणत्या शासकीय अधिका–याचा यात सहभाग आहे? हा कंत्राटदार कुठून औषध उपलब्ध करत होता? कोणत्या कंपन्यांशी त्याचे हितसंबंध आहेत? जिल्ह्यातील कोणते शासकीय अधिकारी यात सहभागी आहेत? याची निःपक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यासाठी एसआयटी पथक नेमून या प्रकरणाचे पाळेमुळे शोधावेत व दोषींना शिक्षा करावी अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे.श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या सर्व शिक्षक सहकारी बंधू भगिनींच्या तसेच समाजातील नागरिकांच्या आरोग्याची योग्य त–हेने काळजी घेण्यात यावी,यासाठी या शिबिरामध्ये सात दिवस दररोज तपासणी होणार आहे. सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व कर्मचारी बंधू भगिनी शहरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आव्हान केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खूर्पे यांनी केले. अध्यक्षीय समारोपात एडवोकेट विश्वास जोशी यांनी या शिबिरात सात दिवसात जे मिळणार असून ते आपण जीवनभर अंगीकारावे जेणेकरून आपण सर्वांचे आरोग्य चांगले राहील अशी अपेक्षा व्यक्त केली. शिबिरामध्ये जोधपुर (राजस्थान) येथील तज्ञ डॉक्टर हे सकाळी ०९ ते १२ आणि दुपारी ०३ ते ०६ या कालावधीत आरोग्य तपासणी करणार आहेत. याप्रसंगी सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक म्हणून श्री प्रकाश दुगड यांची नियुक्ती झाल्याच्या निमित्ताने सर्व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला, तर राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी दीपक घाडगे याने विद्यापीठामार्फत कुलू मनाली येथे आयोजित राष्ट्रीय साहसी शिबिर यशस्वीरित्या पूर्ण केल्याच्या निमित्ताने त्याचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्राचार्य प्रोफेसर सुहास मोराळे डॉ रुपेश पवार यांनी यावेळी समयोचित मनोगत व्यक्त केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी तर आभार क्रीडा संचालक प्रा.डॉ उमेश साडेगावकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शैक्षणिक संकुलातील तिन्ही विभागातील मुख्याध्यापक, शिक्षक बंधू भगिनी,विद्यार्थी,गावातील आरोग्य शिबिराचा लाभ घेणारे नागरिक उपस्थित होते.



## हृदयी मराठी

मायबोलीचाच /आहे अभिमान//
गाऊ किती गुणगाण/मराठीचा //..१

मधूर वाणीने/ जिंकले हे मन//
करती कीर्तन/मराठीत //..२

मराठी भाषेचा/ मान हा राखला//
देतात दाखला/संतजन//...३

अमृतापरी ती/आहे फार गोड /
ना कशाचा तोड/ मराठीला//...४

मराठी नांदते/जन मानसाच्या/
त्याच हृदयाच्या/कोप–यात//...५

**सौ.ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**
**कुरखेडा,जि.गडचिरोली**

## सन २०२३ सालातील राहिलेला ७५% विमा आणि २०२४ सालातील खरीपाचा विमा व अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या :- भाई विष्णुपंत घोलप



पाटोदा (प्रतिनिधी) सन २०२३ मध्ये पावसाच्या खंडामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली होती त्या मध्ये खरीप पीके पुर्णपणे वाया गेले होते.विमा कंपनीने काही शेतकऱ्यांना २५% विमा अग्रीम म्हणून दिला परंतु राहिलेला ७५% विमा कोणत्या पिकासाठी किती टक्के विमा मंजुर झाला तो अद्याप मिळालेला नाही तो तात्काळ द्यावा. सन २०२३ चे सोयाबीन भाव फरकाचे अनुदान हेक्टरी ५ हजार रुपये शासनाने जाहीर केले ते सर्व बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नाही ते तात्काळ वाटप करावे. सन २०२४ सालात खरीप हंगामात सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके वाया गेली त्यावेळेस शासनाने अनुदान जाहिर केले व विमा कंपनीकडुन किती टक्के नुकसान कोणकोणत्या पिकाला देण्यात येणार आहे ते तात्काळ द्यावे. गेल्या तीन महिन्यात हमी भावापेक्षा एक हजार रुपये कमी दराने सोयाबीन बाजारात विकल्या गेली जात आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठे आर्थिक नुकसान झालेले असुन त्यांना भाव फरकाचे किमान हेक्टरी दहा हजार रुपये भरपाई म्हणून शेतकऱ्यांना द्यावे असे लेखी निवेदनाव्दारे भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा ता.पाटोदा जि.बीड यांच्या मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना कळविले आहे. तसेच माहितीस्तव बीड जिल्ह्याचे खासदार व सर्व आमदारांना निवेदनाची माहिती कळविलेली आहे.

## मायबाप जनतेसाठी सदैव तत्पर असणार-आ.संदीप क्षीरसागर



बीड दि.९ (प्रतिनिधी):– बीड विधानसभा मतदारसंघाचे तब्बल दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार संदीप क्षीरसागर यांनी रविवारी (दि.८) रोजी विधानसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. यावेळी मायबाप जनतेच्या आशीर्वादाने आमदार म्हणून काम करण्याची संधी आणि जबाबदारी मिळाली असून मायबाप जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही आमदार संदीप क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त होताना दिली. रविवारी (दि.८) रोजी महाविकास आघाडीतील विधानसभा सदस्यांचा शपथविधी पार पडला. यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले आ.संदीप क्षीरसागर यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्णरण करून आ.क्षीरसागर यांनी आमदारकीची शपथ घेतली. बीड विधानसभा मतदारसंघाचे असलेले सर्व प्रश्न या पवित्र सदनात मांडून बीडच्या जनतेने दिलेली जबाबदारी पार पाडणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

# हंगामी वस्तीगृहातील ५० मुलांना अन्नातून विषबाधा



अबाजोगाई। प्रतिनिधी जि.प शाळा येल्डा येथील शालेय व्यवस्थापण समिती मार्फत ऊसतोड मजूरांच्या मुंलासाठी हंगामी वस्तीगृह चालवण्यात येते. यातील मुलांनी वस्तीगृह चालकांनी काल संध्याकाळी बटाट्याची भाजी ,वरण ,भात, भाकर याचे जेवण केले यानंतर रात्री या मुलांना उलटी चक्कर मळमळ होणे व अस्वस्थ वाटू लागल्यामुळे रात्री दोन ते तीन वाजता मध्यरात्री उपचारासाठी स्वाराती रुग्णालयात आणण्यात आले. असून यामध्ये जवळपास ४७ मुले येथे उपचार घेत असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.या अन्नाचे नमुने तपासणीसाठी घेतले असून नेमके विषबाधा कशामुळे झाली हे येणाऱ्या काळात समजेल यात विषबाधा झालेले व रुग्णालयात भरती असलेले विद्यार्थी पुढील प्रमाणे मुलांना मुकुंद रामप्रसाद चामनर वय ३० वर्ष, प्रतीक्षा मुकुंद चामनर वय पंचवीस वर्ष, रूपाली बबन वाघमारे तेरा वर्ष, सुरेश बाळू शिंदे बारा वर्ष, श्रावणी लहू कांबळे दहा वर्ष, विनोद दशरथ चामनर सोळा वर्ष, अभिषेक रेशीम कांबळे ,शालक भाऊराव कांबळे ,स्वाती शिवाजी कांबळे, रितेश शिवाजी कांबळे, सानवी परमेश्वर चामनर, पूर्वांजली भागवत कांबळे ,सानिया धम्मपाल हातागळे, भुवन मुकुंद चामनर ,राघव धम्मपाल हातागळे, प्रज्वल साहजी पाटोळे, श्रुती अविनाश कांबळे, कृष्णा दिगंबर सोनार वय पाच वर्षे यांच्यासह एकूण ४७ मुले व स्वयंपाक बनवणारे स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचारासाठी दाखल असून त्यांची प्रकृती स्थिर व धोक्याबाहेर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. या हंगामी वस्तीग्रह मध्ये एकूण १८० मुलांची नोंद असून काल जवळपास शंभर ते सव्वाशे मुलांनी जेवण केले मात्र जवळपास ५० मुलांना अन्नातील विषबाधेचा त्रास सुरू झाला व बाकीच्यांना कुठलाही त्रास झाला नाही.ते गावाकडेच आहेत.

### केवळ ३५ रुपयात दोन वेळचे जेवण

शालेय व्यवस्थापण समितीमार्फत चालवण्यात येणाऱ्या हंगामी वस्तीगृहातील मुलांना दोन वेळच्या जेवणासाठी फक्त ३५ रुपये मानधन मिळते. यात भाजी चपाती वरण–भात बनवून खाऊ घालण्याचे दर असून या महागाईच्या काळामध्ये ३५ रुपयात दोन वेळचे जेवण देणे चालकांना कसे परवडेल याचा विचार होणे आवश्यक आहे व या मुलांना सकस अन्न कसे भेटेल याकडे अधिकाऱ्यांनी पाहिले पाहिजे.वेळचे जेवण देणे चालकांना कसे परवडेल याचा विचार होणे आवश्यक आहे व या मुलांना सकस अन्न कसे भेटेल याकडे अधिकाऱ्यांनी पाहिले पाहिजे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १० डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

**गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी नुकतीच जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत**

## शिवरायांवरील निष्ठा

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ नुकतीच रोवली होती. आठ–दहा किल्ले ताब्यात आले होते. हळूहळू नवनवीन योजना तयार होत होत्या. तुकाराम महाराज, मोरया गोसावी, जयरामस्वामी, समर्थ राम दास ही सारी संत मंडळी जनजागरण करीत स्वराज्य भावना चेतवित शिवबांच्या भगव्या निशाणाखाली एकत्रित येण्यास प्रेरणा देत होती. त्यामुळे स्वराज्य बाळस धरु लागलं होते.पण गड लढवायचे, रक्षण करायचे तर त्याची डागडूजी, नव्यानं बांधणी होणं, अभेद्य तट निर्माण करणं आवश्यक होतं. त्या काळच्या युध्द पध्दतीत दुर्गाचं स्थान फार मोठ होतं. दुर्ग म्हणजे राज्याचे आधार ! जातीनं लक्ष घालून महाराजांनी दुर्गांचं काम सुरु केले. गावोगावचे पाथरवट, मजूर कामास लावले. सहा–सहा महिने, वर्षानुवर्षे काम सुरु होतं.

शिवनेरी किल्ल्यावरही पाथरवट मोठ्या संख्येने व उत्साहाने दगड नीट चौकोनी करण्याचे काम करीत होते. तर मजूर दगड वर चढवीत होते. गवंडी ते दगड चुन्यात घट्ट बसवीत होते. तेवढ्यात एका मजूराचे लक्ष चढण चढून येणा–या गोसाव्याकडे गेले. संधिप्रकाशात ती चढण आजूबाजूला असलेली झाडी आणि त्या मार्गाने येणारा गोसावी हे मोठं मनोरम दृश्य दिसत होतं. अधिक न्याहाळून बघत तो म्हणाला, हे मोरया स्वामी. लगेचच सर्वांनी पुढे जाऊन स्वामींचा जयजयकार केला व साष्टांग दंडवत घातले. स्वामीजी थबकले. जम लेल्या मंडळींवर त्यांनी एक नजर फिरवली. एवढी आडदंड दिसणारी ही मंडळी खुश दिसत नाही. उत्साहाने वावरत असले तरी चेहरे फिकुटलेले होते. कुठंतरी औदासिंन्य जाणवत होतं.

परिस्थितीचा अंदाज घेत स्वामींनी विचारले, मका रे बाबा असे रोडावलात ?फ काय उत्तर द्यायचं. एक दुस–याकडे बघू लागले. शेवटी एक जण पुढे येऊन लिनतेने सांगू लागला, ङ्गस्वामीजी, आज दोन महिने झाले मजूरी मिळाली नाही. महाराजांजवळ पैसा नाही. एरवी त्या देवमाणसाने असं भूकेलं कसं ठेवलं असतं ?ङ्ग त्यानं उलट प्रश्न केला गोसावी विचार करु लागले. या हातावर कमवायचं अनब या हातावर खर्च करायचं अशी जीवन जगणारी ही माणसं कसं बरं करत असतील? ते म्हणाले इथून दुसरा रोजगार जमलं तर करतो व पोट भरतो.

शिवाजी महाराज पगार देत नाही ना? मग मोगलांकडे उद्योगधंद्याला जा, भरपूर पैसा आहे. त्यांच्याकडे खाण्याची चंगळ होईल?

ङ्गकाय बोलता आहात स्वामीजी? आमच्या राजाची आमच्यावर लय माया हाय, आम्हाला पगार न दिल्याचं दुःख नाही. महाराजांकडून पैसा मिळो न मिळो, या शरीरात शक्ती आहे, रक्ताचा शेवटचा थेंब आहे तोवर या मायभूमीचीच सेवा करु आम्ही. मृत्यूमुखी जाता–जाता या प्रदेशातले किल्ले कोट दणकट व मजबूत झाले तर महाराज आमच्या उपासनेचे सार्थक म्हणू. घरांत आठरा विश्वे दारिद्रयं असतानाही उसाची गाडी लुटविणारे तुकोबाराय यांच्या डोळ्यासमोर होते. महाराज पोट तर काय कोल्ही कुत्री मांजर देखील पोट भरतात. या पोटा करीता धन्याशी बेईमान होण्यात कोणती मर्दूभक्ती? संकटात सापडलेल्याला सोडून जाण्यापरती दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाही. महाराज आम्हाला खात्री आहे. आम चा राजा आम्हाला लवकरच पगार देईल आणि नाही दिला तरी श्वास चालू आहे तोवर हात किल्ले कोटाचे दगड बनवतच राहतील. दुसरा पाथरवट म्हणाला, मस्वाम ीजी पोटाला नीट मिळत नाही म्हणून काम व्हावं त्या वेगानं होत नाही, हे पोट मोठं द्वाड हाय. त्याला दिलं नाही त्यामुळं ते आम्हाला थकवतं याचं फार वाईट वाटतं म. तिसरा मजूर म्हणाला, आणि ... आता पर्यंत त्यांना आशीर्वाद देणारा तो गोसावी त्या मजूरांपुढे पुरताच नतमस्तक झाला.

धन्य तो खंडोबल्लाळ नि धन्य त्यांची स्वामीनिष्ठा :– राजाराम महाराज जिंजीस आडकून पडलेले मोंगलांचा वेढा उठण्याची शक्यता दिसेना. अशातच राजाराम म हाराजांची प्रकृती बिघडली. जिंजीहून त्यांची सुटका करायला हवी होती. एक दिवस खंडोबल्लाळने एक धाडसी योजना ठरविली. किल्ल्याच्या वेढ्यात मराठा गणोजी शिर्के यांची छावणी ज्या बाजूला होती त्या बाजूला दोरांच्या सहाय्याने पाळणा खाली उतरवून खंडोबल्लाळ गडाखाली उतरला. पहारेक–यांशी सूत जमवून गणोजी शिर्के ची भेट घेतली. गणोजी हा संभाजीच्या कारकीर्दीत मराठी राज्याचा हाडवैरी बनला होता. तरीही खंडोबल्लाळने त्याला सूचना केली की राजाराम महाराजांना आपल्या छावणीतून पलिकडे जायला आपण वाट द्यावी. त्यावर गणोजी शिर्के खवळला आणि त्यांच्या घराण्यावर झालेल्या अन्यायाचा बदला घेण्याचा निश्चय त्याने बोलून दाखविला. त्यावर खंडोजी नम्रपणे म्हणाला, ङ्गमाझ्या वडिलांना आणि सख्या भावांना महाराजांनी हत्तीच्या पायाखाली दिले. तरीही बदल्याचा विचार मनात न आणता गादीची अखंड सेवा करुन स्वराज्याच हित करण्याच कर्तव्य बुध्दीपासून मी ढळलो नाही. वैयक्तिक मनापमान देशहितापुढे मागे सारावे लागतं. आपणही स्वराज्याचा विचार प्रशन मानावेत. गणोजी त्यावर म्हणाला, खंडोजी, त्यागाच्या गोष्टी फूकट बोलू नको, वतना करताच ना तुम्ही सर्व धडपड करता आहात?फखंडोजी म्हणाला, ममुळीच नाही हे घ्या माझ्या नावाचे वतन,मी आपल्या नावाने करुन देतो. खंडोजीने खरोखरच आपले वतन गणोजीच्या नावाने करुन दिले. त्याचा योग्य तो परिणाम झाला. राजाराम महाराजांची सुटका खंडोबल्लाळने आपल्या त्यागवृत्तीच्या सहाय्याने अशी केली.

खंडोबल्लाळाची स्वामिनिष्ठा :– छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्यात आपसात भांडणे सुरु झाली. ही संधी साधून दिल्लीच्या औरंगजेब बादशहाचे मोठे सैन्य मराठी राज्यावर चालून आले. त्यावेळी संभाजी महाराज राजे होते. ते शुर व पराक्रमी होते परंतु औरंगजेबाच्या मोठ्या सैन्यापुढे त्यांचे काहीही चालले नाही. औरंगजेबाच्या सैन्याने संभाजी महाराजास पकडले व त्यांस हालहाल करुन ठार मारले. औरंगजेबाच्या या अमानुष कृत्यामुळे मराठे चिडले. संभाजी महाराजांनंतर राजाराम महाराज गादीवर बसले. इकडे रायगडाला औरंगजेबाच्या सैन्याने वेढा दिला. त्यावेळी मराठा सरदारांनी ठरविले की राजाराम म हाराजांनी येथून दक्षिणेकडे जिंजी येथे जावे. ठरल्याप्रमाणे बैराग्याचा वेश धारण करुन राजाराम महाराज, खंडोबल्लाळ व आणखी काही निवडक लोक बरोबर घेऊन जिंजीकडे निघाले. ही बातमी औरंगजेबाला समजली. त्याने सगळ्या ठिकाणच्या ठाणेदारांना राजारामास पकडण्यास सांगितले.

राजाराम महाराज व बरोबरचे लोक बैराग्याच्या वेशात एका गावी धर्मशाळेत उतरले. तेथे राजाराम पाय धूत असताना बरोबरच्या दुस–या माणसाने पायावर पाणी घातलेले पाहून धर्मशाळेतील लोकांना संशय आला. त्यांनी ठाणेदारांना कळवले. ही गोष्ट खंडोबल्लाळाच्या लक्षात आली. त्याने लगबगीने राजाराम महाराजांना पुढे रवाना करुन दिले. इकडे ठाणेदार धर्मशाळेत आला. त्याने खंडोबल्लांना पकडले. राजाराम कुठे आहे? असे विचारले. तेव्हा तो म्हणाला मला माहित नाही. मी रामेश्वरचा यात्रेकरु आहे. खंडोबल्लाळने खरे सांगावे म्हणून ठाणेदाराने त्याला साखळदंडाने बांधले. डोक्यावर मोठमोठे दगड ठेवले. मारले, राखेचे तोबरे, मिर्च्यांची धूरी दिली. इतके हाल हाल झाले तरी खंडोबल्लाळने आपल्या धन्याचा पत्ता लागू दिला नाही. त्याचे आपले एकच उत्तर म आम्हाला राजाराम कोण ते माहित नाहीफ शेवटी ठाणेदार कंटाळला. त्याला वाटले हा खरोखरच रामेश्वरचा यात्रेकरु आहे. त्याने खंडोबल्लाळला सोडून दिले. इतके होईपर्यंत राजाराम महाराज जिंजीस सुखरुप पोहचले. आपल्या धन्याच्या रक्षणासाठी खंडोबल्लाळने केवढी भयंकर शिक्षा सहन केली.

नाचण्याची आंबील :– एकदा काय झाले, जंजिरकर सिद्दी आपल्या लवाजम्यासह शिकारी करीता मराठ्यांच्या मुलूखात आला. इकडे बिपटे वाघ फार. अशाच एका शिकारीच्या नांदी लागून खासा सिद्दी एकटाच भटकत सुटला! बरोबरीचे शिकारी दुसरीकडे गेले व हा एकटाच भलतीकडे गेला. हिंडता हिंडता फार दुपार झाली. खाशा सिद्दीचे अंग उन्हाने भाजून निघाले. तहानेने घशाला कोरड पडली होती.फिरता फिरता त्याला दूर अंतरावर एक झोपडी दिसली. पाणी मिळाले तर पहावे म्हणून तो तिकडे गेला. तेथे एक म्हातारी चुलीपाशी काहीतरी रांधत असलेली त्याला दिसली. सिद्दी म्हणाला, आजीबाई मी एक वाटसरु आहे.मला थोडे पाणी देता का? म्हातारीने त्याच्याकडे निरखून पाहिले व म्हणाली, ङ्गबाबारे तू कोणी मुसलमान दिसतोस, थांब तुला एक गाडगे भरुन देते. हातपाय धू नि वळचणीत बस. भर दुपारी तू माझ्या दाराशी आला आहे. घोटभर पेज खाल्ल्याशिवाय मी तुला जाऊ देणार नाही. देव कुठल्या रुपाने येतो व सत्व घेऊन जातो हे सांगता येत नाही. सिद्दीला भूकही फार लागली होती. म्हातारीने मातीच्या एका परळात नाचण्याची आंबील व तिखटाचा गोळा त्याच्यापुढे ठेवला. जिंजियाचा नबाबच तो! त्याला ती खपेना चाणाक्ष म्हातारीच्या ते लक्षात आले. ती म्हणाली, ङ्गबाबारे तू कोणा थोरा मोठ्याचा घरचा दिसतोस. तुला हा आंबील खाववत नाही. पण मी तरी काय करु? माझे चार कर्ते मुलगे या सिद्दीने पकडून नेले व मला अनाथ केले. मी इथेच डोंगरावर नाचणी काढून पोट भरते. ते सुध्दा देवाला पाहावले नाही. पण या मेल्या सिद्दीच्या सैन्याने १५ दिवसांपूर्वी मळणी लुटून नेली. यांच्या नजरेतून बचावलेली कणस मळून मी कशीतरी गुजराण करते आहे. आज मजजवळ थोड्या लोंबी होत्या म्हणून ही आंबील तरी तुला देता आली. देवा नारायणा कधी रे त्या सिद्दीला सुबुध्दी देशील?

सिद्दीचा हात खोळंबला व डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ते पाहून म्हातारी म्हणाली, ङ्गतू माझा अतिथी आहेस तू पोटभर खा,आम्हा गरीबांना काय? दोन बखत पेज आंबील मिळाली की दिवसभर धरतीची सेवा करीत राहून राजाला दुवा देऊ नि आपल्या पोटातील पेज काढून तुझ्यासारख्या पाहूण्याला दुपारच्या वेळी जेऊ घालू. दुसरे तिसरे काही नको. राजाचा होतो खेळ पण गरीबांचा जातो जीवङ्ग

म्हातारीचे हे बोलणे ऐकून सिद्दीचे अंतःकरण द्रवले. आजीबाईला तो म्हणाला, ङ्गखरं आहे तुमच म्हणणं. तो सिद्दी माझा मित्र आहे. त्याला सांगून मी तुमचे मुलगे परत देतो पण तो जर तुम्हाला काही इनाम देऊ लागला तर काय मागून घ्याल तुम्ही?



माझ्यासाठी छेः छे! मला काहीही नको, मला ही पेज हा समोरचा डोंगर देईल. मला दागदागिणे, हत्ती, घोडे यांची मुळीच जरुर नाही. माझे मुलगेही धरती मातेची सेवा करुन पोट भरतील. त्या सिद्दीला म्हणावं, तुला काही करायचं असल तर गरीबांच्या तोंडातला घास काढून घेणारी लुटालुट बंद करङ्ग

म्हातारीच्या निर्लोभीपणा, निस्पृहपणा व अतिथी सत्कार पाहून सिद्दी खूश झाला. तो परत छावणीत आल्यावर त्याने म्हातारीची नीट चौकशी केली व तिच्या चारही मुलांना सोडून देऊन तो संबंध डोंगर व सभोवतालची जमीन त्याने तिला इनाम करुन दिली आणि शेतकरी प्रजेला उचलून न देण्याचे फर्मान काढले.

माणसांच्या प्रेमापेक्षा कुत्र्याचं प्रेम :– मानव जातीच्या इतिहासात ज्या काही मोजक्या मानवतेच्या प्राण्यांनी आपला समावेश करुन घेतला. त्यापैकी एक होता छत्रपती शिवाजी महाराजांचा ङ्गवाघ्याङ्ग नावाचा कुत्रा. महाराजांवर वाघ्याचा कम ालीचा जीव होता. महाराजांचाही वाघ्या तसा मोठा लाडाचा होता. वाघ्या हा महाराजांच्या मागे सतत सावली सारखा असायचा.

एकदा महाराज कुठेतरी जात होते. अचानक त्यांच्यावर मोगल सैनिकांशी हातघाईची लढाई करण्याचा प्रसंग आला. महाराज गनिमांशी लढत असताना एक शत्रू सैनिक त्यांच्यावर हल्ला करण्यासाठी त्यांच्या मागून आला. तो आता महाराजांवर घाव घालणार इतक्यात वाघ्याने त्याच्यावर झेप घेऊन त्याच्या पोटरीचा असा लचका काढला की त्याच क्षणी मया अल्लाफ अशी मोठ्या आवाजाने आरोळी ठोकून तो तोल जाऊन खाली कोसळला. त्याबरोबर महाराजांच्या एका मावळ्याचे तिकडे लक्ष गेले आणि त्याने त्या गनिमाचे मस्तकच उडविले.

महाराजांचे देहांत झाल्यावर जेव्हा त्यांची अंतयात्रा निघाली, तेव्हा वाघ्याचीही स्वारी त्यात सामील झाली, महाराजांचा पार्थिव देह चितेवर ठेवला गेला आणि राजारामाने चितेला अग्नी दिला. हा सर्व प्रकार वाघ्या एकटक नजरेने बघतच होता. चिता धगधगू लागली. ङ्गमहाराजांना स्वर्गीय प्रवासात आपण सोबत केली पाहिजेङ्ग. असा विचार जणू निष्ठावान प्राण्याच्या मनात आला असावा आणि एकाएकी उडीचा पवित्रा घेऊन वाघ्याने आपला देह त्या चितेत झोकून दिला! मधन्य त्या मुक्या वाघ्या जीवाचीफ या धाडसी व निष्ठावान वाघ्याची समाधी रायगडावर महाराजांच्या समाधी शेजारी पाहावयास मिळते.

महाराजांच्या मृत्यूसमयी जी काही अधिकारी मंडळी रायगडावर उपस्थित होती. त्यांनी महाराजांच्या निधनाची खबर त्यांच्या शत्रूंना कळू नये म्हणून सुरक्षेच्या कारणास्तव ही दुःखदब घटना, रायगडाच्या बाहेर कुणाला माहित होणार नाही असा बंदोबस्त केला. त्यामुळे महाराजांच्या अंत्यविधीला फक्त रायगडावरचीच माणसे उपस्थित होती. वाघ्याचं ते धाडसी कृत्य पाहून त्यातही काही माणसे कौतुकाने पण उदासपणे उदगारली, ङ्गआम्हा माणसांपेक्षा वाघ्या कुत्र्याचंच महाराजांवर जीवापार प्रेम होतं

महाराजांचा दरारा :– मनुची हा इटालीयन प्रवासी ५० वर्षे भारतात भ्रमण करीत होता. तो लिहितो ङ्गमी मिर्झाराजे जयसिंगाच्या तोफखान्यावर १० रु. रोजाने काम करीत होतो. मी स्वतः पाहिले की एका द्वारपालाला एक व्यक्ती सांगत होती– तुझ्या राजाला जाऊन सांग शिवाजी आला आहे. ङ्गशि–वा–जी एकेका अक्षराला एक अशा त्या शिवरायाने तीन कोलांट्या खाल्ल्या. स्वतः राजांनी त्याला हसत हसत उठवले, म्हणाले, ङ्गअरे ! नेहमीच आम्हापाशी वाघनखे नसतात बरे !

**राजेंद्र चौधरी.**
**रोझोदा. ता. रावेर. जि. जळगाव.**
**मो.७७००९८२७६५**

# नगर पालिका कधी जागी होणार पालिकेचा गलथाण कारभार

नमस्कार मी रुपाली देशपांडे मला आज नगर पालिका या विषयावर बोलायचे आहे. नगर पालिका कधी जागी होणार पालिकेचा गलथाण कारभार *हो मला हेच म्हणायचं की नगरपालिकेचा गलथाण कारभार कधी बंद होणार*? नगरपालिके ला कधी कळणार की बीड मध्ये जागोजागी कचरा कुंडी ची आवश्यकता आहे. नगरपालिकाने डोळ्याला झापडे लावले असतील तर ती जरा उघडा आणि तुम्हला जाणूनबुजून नसेल उघडायची तर आम्ही तयारच आहोत तुमची झापड उघडायाला आपला कचरा सर्व कचरा कुंडीत टाकावा अशी जनजागृती करा. काही तरी लोकांना दंड ठेवा. कच–यामुळेच बीड शहरात घाणीचे साम्राज्य झालं आहे थोडक्यात असताना पालिकेनी केल असते तर बीडम ध्ये एवढी घाण पसरली नसती. एक गल्ली एक कचरा कुंडी एक कॉलनी एक कचरा कुंडी हि सूत्रांची अंमलबजावणी केली असती तर आज एवढी घाण पसरलेली नसते. नगरपालिकेचे महत्वाचे काम काय असते तर शहरा मध्ये स्वच्छता ठेवणे.पाण्याचा प्रश्न सोडवणे. इतर बाकी कामे आहेतच. शहरात काहीच स्वच्छता नाही. मग मला एक प्रश्न पडला की शहरासाठीआलेला निधी जातो कोठे? शहर स्वच्छ होत नाही. नळा पाणी व्यवस्थित नाही. शहरात ५० ठिकाणी बॅनर लागले. ते परमिशन दिली तर ठीक नसेल परमिशन तर ते बाकी बँनर कोणी लावले आणि कसे हा एक प्रश्नच आहे. शहरातील नाल्या व्यवस्थित नाही, ज्या आहेत तिथे कचरा अडकलेला असतो. ट्रॅफिक पोलीस नीट काम करत नाही त्या मुळे होणारे अपघात आणि मरणाय–याची संख्या जास्त होत चालली आहे. हे सगळं नगरपालिकेच काम असतणा शहराची अवस्था काय आहे. आलेला निधी तिथेच जिरतो का? जिरत नसेल तर पैसा कोठे आहे? थोडा दिखाऊपणा करून थोडा पैसा कामा साठी लावायचा आणि बाकी पैसा कोठे आहे. याला लोक हि कारणीभूत आहेत.



कारण लोकांना प्रश्नच पडत नाही जाणसामान्य माणसे तसेच मुसकाट दाबून राहतात. लोकहो विचारा पालिकेला विकासाचा पैसे कुठे आहे.मग बघा काय काय होत ते. समाजाला जो पर्यंत प्रश्नच पडत नाही तोपर्यंत विकास होणार नाही. लोकांच्या वतीने मी हि विचारते की आलेला निधी काय झाला? नगरपालिका कधी जागी होणार? आलेला निधी असाच गायब होणार का? मला आता मीडिया ला सुद्धा विचारायचं आहे की, तुम्ही लोक मूग गिळून गप्प का? असे हि असेल कदाचित थोडाफार निधी मधील पैसा तुमच्या पर्यंत हि पोहचला असेल. निवडणूक आली की तुम्ही लोक इथे जागे होतात की विचाराची सोय नाही.दिवसरात्र त्याचं बातम्या. मग इकडे एखादी चुकून बातमी टाकली की बस मग शांत? तुम्ही हि गोष्ट मग मनावर का घेत नाही, याचं उत्तर मीडियाने द्यावे कारण मीडिया खूप जलद गतीने काम करतो तसेच. जनजागृती चे हि काम प्रभावित होते. असे असूनही मीडिया गप्प का? लोकांहो, तुम्हीच आता जागे व्हा. तुमचे प्रश्न तुम्हीच सोडवा. तुम्हीच तुम्हला न्याय मिळवून दया, जागे व्हा असे झोपून कसे चालेल, तुम्ही जागे झालात तर नगरपालिका जागी होईल. रोज उठून पाणी, वीज या गोष्टी पण सोडवता येत नसेल तर लोकांहो तुम्ही षंड आहात का असेच म्हणावे लागेल. नगरपालिकेला अजून एक विचारायचे आहे की पालिका तुम्ही स्वातंत्र्य मिळून इतकी वर्ष होऊन गेले तुम्ही अजून हे बेसिक प्रश्न हि सोडवले नाही? तुम्हला आजच्या काळत हि या प्रश्नावर भाकरी भाजून घायची आहे का? हेच प्रश्न अजून हि तसेच ठेऊन जनतेला आहे. तसे ताटकळत ठेवायचे अन वर्षाहून वर्षे निधी जिरावायचा आहे का? असे असेल तर आम्हला आवाज उठवावा लागेल आणि आवाज आता मुबंई च काय दिल्ली पर्यंत जाईल इतका कणखर आहे. उठा जागे व्हा

**संपर्क –**
**रुपाली देशपांडे ८८८८९५५५३९**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १० डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## ह.भ.प. प्रज्ञाताई पंडित यांचे जेजुरी गडावर श्री मल्हार स्तोत्र निरूपण संपन्न



जेजुरी गडावर श्री मार्तंड देवसंस्थान आणि श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने *श्री मल्हार स्तोत्र निरूपण* या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम शनिवार, ७ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध प्रवचनकार *ह.भ.प. प्रज्ञाताई पंडित* यांनी श्री मल्हार स्तोत्रावर अतिशय भावपूर्ण निरूपण केले. प्रा. प्रज्ञाताई पंडित या हिंदू वेद, पुराण, स्तोत्र आणि विष्णू सहस्रनामावर निरूपण करणा-या ठाण्यातील एकमेव विद्वान आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून त्या मप्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्गफ या माध्यमातून जगभरातील भक्तांना विष्णू सहस्रनाम आणि १०० पेक्षा जास्त स्तोत्रांचे शिक्षण देत आहेत. त्यांनी विविध मंदिरांत आणि धार्मिक आस्थापनांत निरूपण केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन व संकल्पना श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टच्या अध्यक्षा *सौ. मनीषा खेडेकर* यांनी केली होती. त्या स्मायर फार्मास्युटिकल्सच्या संचालिका असून सामाजिक उपक्रमांसाठी त्या विशेष सक्रिय आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे विश्वस्त *डॉ. राजेंद्र खेडेकर, ॲड. पांडुरंग थोरवे, मंगेश घोणे* यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित सदस्यांमध्ये माननीय खड्गड भाग्यश्री नवटके, समादेशक, राज्य राखीव पोलीस दल गट, चंद्रपूर, राहुल निकम, संतोष खोमणे, महेश शिंदे, दादा खोमणे* यांचा समावेश होता. हा कार्यक्रम भाविक आणि भक्तांसाठी एक प्रेरणादायी धार्मिक सोहळा ठरला.

## पोलिस पाटील विद्या दौलत सरपाते यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर.



कवयित्री विद्या दौलत सरपाते यांना दैनिक भारत सं-ग्राम आयोजित स्वर्गीय मधुकरराव खंडारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तसेच समाजभूषण अर्जुन गव ई यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित २०२४-२५ च्या राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार जाहीर झाला आहे.विद्या सरपाते या गुंज-खेड ,ता.लोणार,जि.बुलढाणा येथे पोलिस पाटील पदावर कार्यरत असूनतब यांचे मसोनं मातीतलं वेचतानाफ आणि मआम्ही रानातली फुलेफ हे कविता संग्रह प्रकाशित आ-हेत.त्यांच्या सोनं मातीतलं वेचताना कविता संग्रहास यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाडब.मय पुरस्कार मिळालेला आहे.

## विश्वनाथ पंडित यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर



पाच दशकांहून अधिक काळ सामाजिक, विधायक कार्यात अग्रेसर राहणारे आणि लेखणीव्दारे वृत्तपत्रांतून समाजातील व्यथा, वेदना, समस्या आजही सातत्याने मांडत रहाणारे जेष्ठ वृतपत्र लेखक विश्वनाथ पंडित यांना मुंबईतील जॉय सामाजिक संस्था या प्रतीथयश संस्थेद्वारे पंडित यांनी अंगीकारलेल्या जीवनभर सामाजिक कार्याची दखल घेत संस्थेच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार समारंभपूर्वक बहाल करण्याची घोषणा संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष गणेश हिरवे गुरुजी यांनी जाहीर केले. सदर समारंभ संस्थेच्या वर्धापनदिनी आयोजित करण्यात येणार आहे.

# आ. गोपीचंद पडळकर यांना मंत्री पद देऊन ; जलसंपदा खाते देण्याची मागणी - शारदाताई पांढरे

पाटोदा प्रतिनिधी :- नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत बहुजन हृदय सम्राट बहुजनांचा आवाज मा गोपीचंद पडळकर यांना बहुमतांनी जनतेने विधानभवनात पाठवले आहे. अपेक्षेप्रमाणे राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा कारभार हाती घेतला आहे. तर एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. आणि त्याचबरोबर पक्ष वाढवण्यासाठी निष्ठेने काम करणारे गोपीचंद पडळकर यांच्या मंत्री पदाकडे जतकरांचेच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील



### आ.गोपीचंद पडळकर हे सर्व सामान्यांच्या हिताचे निर्णय घेणारे एकमेव नेते

जत विधानसभा मतदार संघात चौत्यांदा कमळ फुलवण्याची किमया केली आहे .आणि गेले अनेक वर्षापासून पक्ष वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली एक निष्ठेने काम केले आहे.आणि त्याच फळ म्हणून आ.पडळकर यांचा ऐतिहासिक विजय झाला असून त्यांना विक्रमी ३८ हजार ४५३ चे मताधिक्य मिळाले आहे. मुख्यमंत्री यांच्या गळ्यातील तावित म्हणून ओळख असणारे बहुजनांचे नेते आ.गोपीचंद पडळकर यांना मंत्री पद द्यावे अशी मागणी जत करच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रत होत आहे.

**मा.नितिन भोंडवे**
**(कार्यकर्ता)**

जनतेचे लक्ष लागले आहे. आ पडळकर यांचे मंत्रीपद निश्चित मानले जात असून त्यांच्याकडे जलसंपदा खाते सोपवावे अशी सामाजिक कार्यकर्त्या शारदाताई पांढरे यांच्याकडून मागणी होत आहे. या मंत्रिपदाने जतकरांचा दुष्काळ तर संपणारच आहे परंतु महाराष्ट्रातील विविध भाग दुष्काळ मुक्त होण्यास मदत होईल



अशी भावना शारदाताई पांढरे यांनी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या गळ्यातील ताईत म्हणून ओळखल्या जाणा-या आ. गोपीचंद पडळकर यांना जतकरांनी विक्रमी मतांनी विजयी करत विधानभवनात पाठवले आहे.

# सुलेखनकार, श्री. रत्नकांत अनंतराव विचारे यांना राष्ट्रस्तरीय महात्मा ज्योतिराव फुले महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२४ २५.

सुलेखनकार श्री. रत्नकांत अनंतराव विचारे गांधी बालमंदिर हायस्कूल कुर्ला ७० यांना, त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यातील योगदानासाठी, ग्लोबल गोल्ड टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड नवी मुंबई यांच्यातर्फे २०२४ २५ चा राष्ट्रस्तरीय महात्मा ज्योतिराव फुले ङ्गमहाराष्ट्र रत्नङ्ग हा सन्मानाचा पुरस्कार प्रसिद्ध अभिनेते व विनोद वीर सन्माननीय श्री. जॉनी रावत यांच्यातर्फे देऊन गौरवण्यात आले आहे. सुलेखनकार रत्नकांत अनंतराव विचारे हे गेली ३२ वर्ष गांधी बाल मंदिर कुर्ला, या शाळेत कार्यरत असून त्यांनी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमात भाग घेऊन अनेक पुरस्कार मिळविलेले आहेत. १) सतत दहा वर्ष आई-वडील नसलेल्या अनाथ




आणि गरीब होतकरू विद्यार्थ्यांची शालेय वार्षिक हजार रुपये फी लोकवर्गणीतून जमा करून भरणे .(यावर्षी ७६ हजार रुपये भरले) २) सतत नऊ वर्ष कॅन्सर पीडित लोकांसाठी एनडीएस संस्थेमार्फत सेमिनार मध्ये समुपदेशन करणे. शक्य असल्यास घरी जाऊन कर्करोग ग्रस्त रुग्णांना डायट समजावणे. अशी कामे केली आहेत. (ऑनलाइन भारतासह इंग्लंड अमेरिका व कॅनडा या देशातही ) ३) विद्यार्थ्यांच्या सुंदर हस्ताक्षरासाठी सुलेखन वर्ग घेणे. शुद्धलेखन वर्ग घेणे. चित्रकलेसाठी विद्यार्थी उपक्रम राबवणे. दरवर्षी एलिमेंट्री इंटरमिजिएट चा मोफत क्लास घेऊन शंभर टक्के रिझल्ट लावणे. ४) जनजागृती समिती पुस्तकांची मुखपृष्ठे बनविणे. ५) सुंदर शालेय फलक लेखन करणे. अशा अनेक शैक्षणिक व सामाजिक उल्लेखनीय कामाच्या सन्मानार्थ त्यांना २०२४..२५ चा महाराष्ट्र रत्न हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे. शाळेतही अनेक उपक्रमात त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. स्वच्छ नदी अभियान, संविधान दिन, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, करुणा काळातील शैक्षणिक साहित्य वाटप, किराणा वाटप, लसीकरण मोहीम, चित्रकलेसाठीही ग्रीटिंग कार्ड व कंदील बनवणे उपक्रम अशा अनेक उपक्रमातुन सामाजिक बांधिलकी जपण्याचा ते प्रयत्न करतात. या पुरस्काराबाबत समाजाच्या सर्व थरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पर्यवेक्षक व मुख्याध्यापक श्री. अनिल पांचाळ सर यांनी या पुरस्काराबाबत श्री .रत्नकांत विचारे सरांचे अभिनंदन केले आहे.

# ज्ञानाच्या अथांग महासागरास जनसागर अभिवादनासाठी उसळला !

माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणा-या महामानवाला ६८वा महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी, भारताच्या कानाकोप-यांतून येत असताना, दादर रेल्वे स्थानक जवळ शिवाजी पार्क च्या दिशेने नक्षत्र मॉल शेजारी सामाजिक संस्था आधारस्तंभ सामाजिक संस्था (रजि), समस्त रानडे रोड फेरीवाले, दुकानदार व रहिवासी च्या वतीने, मंडप मध्ये, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विश्वरत्न



डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून, दीप प्रज्वलन करून बुद्ध वंदना करून, शिवाजी पार्क च्या दिशेने जाणा-या अभिवादन करण्यासाठी, प्रत्येक अनुयायांना बिस्कीट- वडापाव आणि पाणी बाटल्या वाटप करण्यात आले.

तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापरिनिर्वाण दिनानिमित्त ङ्गकोकण दीप विशेष अंकाचे प्रकाशनङ्ग करण्यात आले. आधारस्तंभ सामाजिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष श्री व सौ सतिश थोरात, धम्म संस्कार संस्था- ठाणे, तसेच जेष्ठ पत्रकार शशिकांत सावंत, कोकण दीपचे संपादक दिलीप शेडगे आणि साहित्यिक व कवी विलास देवळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. आणि चैत्यभूमी कडे जाणा-यांना मकोकण दीप विशेष अंकाचेफ वाटप करण्यात आले.

# चांदवड येथे मौर्य क्रांती महासंघा व्दारा धनगर जागृती परिषदेच्या तिस-या अधिवेशनाचे आयोजन.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नाशिक जिल्ह्यातील चांदवड या ऐतिहासिक नगरीत मौर्य क्रांती महासंघ , महाराष्ट्र राज्य व्दारा धनगर जागृती परिषदेच्या तिस-्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बलभीम माथेले यांनी प्रसारमाध्यमांना प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.ङ्ग एकट्याने नाही तर एकीने लढू याङ्ग,ङ्ग माझे शिक्षण माझ्या समाजा साठीङ्ग या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात मौर्य क्रांती महासंघ कार्यरत आहे, धनगर समाजाच्या विविध विषयांवर समाजातील तज्ज्ञ, विचारवंत या वेळी मार्गदर्शन करणार आहेत.या पूर्वी मौर्य क्रांती महासंघाची दोन अधिवेशनाचे आयोजन जेजुरी या ठिकाणी करण्यात आले होते.आणि आता तिसरे अधिवेशन नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथे होत आहे, सुरुवातीला पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे, धनगरी ओव्या, गजी नृत्य, लेझीम, धनगर समाजाच्या पारंपरिक कला, देवदेवतांच्या नावे घोषणा, मान्यवरांच्या कार्याचा गौरव म्हणून पुरस्कार, आदी भरगच्च कार्यक्रम या तिस-या अधिवेशनात होणार असून पुढील कार्यासाठी काही ठराव मंजूर करण्यात येणार आहेत.आरक्षण अमंलबजावणी चा प्रश्न, शेळ्या मेंढ्या च्या चराऊ कुरणाचा प्रश्न, शिष्यवृत्ती, शासकीय आर्थिक योजनांचा लाभ,व धनगर समाजाच्या इतर समस्याचा या अधिवेशनात विचार विनिमय करण्यात येणार आहे.लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रीशताब्दी जयंती वर्षात होळकर शाहीच्या पदकमलानी पावन अशा दैदिप्यमान इतिहासाची साक्ष असलेल्या चांदवड नगरीत होत असलेल्या तिस-या अधिवेशनात सत्यशोधक विचाराचे अनुयायी मारोतरावजी पिसाळ यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्कार प्रबोधनकार पुरस्कार प्रत्येक अधिवेशनात वेगवेगळ्या मान्यवरांना दिला जातो.या वर्षी या अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील नामवंत वक्ते प्रबोधनकार,प्रा.आर.एस.यादव सर यांना देण्यात येणार असल्याचे मौर्य क्रांती महासंघाने जाहीर केले आहे.या धनगर समाजाच्या तिस-या अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील तमाम धनगर समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन धनगर समाजाचे पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम यांनी केले आहे.

# जीवनगौरव स्नेहबंध पाली भाषा काव्य साधना काव्य प्रतिभा पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न

प्रतिनिधी -जगदीप वनशिव

अहिल्यानगर- जिल्हातील हिवरे बाजार येथे पुणे येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान आयोजित पाली मराठी भाषेचे पहिले शब्द कोशाकार बाबा भारती यांच्या जन्म शताब्दी निमित्त वार्षिक शब्दोत्सव सातवां उपक्रम विविध क्षेत्रातील पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रतिमा पूजन वृक्ष पूजन पद्मश्री गिरीश प्रभुणे ज्येष्ठ साहित्यिक ज्ञानवंत डॉ श्रीपाल सबनीस पद्मश्री पोपटराव पवार निमंत्रक महेंद्र भारती अध्यक्ष लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान मा पुरूषोत्तम सदाफुले मामा मुख्य संयोजक यांच्या शुभ हस्ते उद्घाटन समारंभ झाला असून पुरस्कार प्रदान सोहळ्याचे स्वागत बुद्ध वंदना सचिन कांबळे यानी सादर केली कवी सतिश मोघे यांची पुन्हा जन्म घे भीमा या कवितेची ध्वनीफिती सादर करण्यात आली प्रमुख पाहुण्याचे सत्कार करण्यात आले शाल उद्देशिका पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आहे तसेच पाच गुणवान विद्यार्थी यांचा गुणगौरव करण्यात आला प्रास्ताविक महेंद्र भारती यानी केले जीवन गौरव पुरस्कार मानपत्र वाचन जयश्री श्रीखंडे यांनी केले जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले समाज कार्य करताना जीवन जगण्याची वाट मिळते नातीगोती सांभाळण्याचे धैर्य वाढते मुलांवर संस्कार केले पाहिजेत विद्वान होऊन विद्यार्थी पुढे जातील हाच एक मूळ उद्देश आहे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला रानकवी जगदीप वन शिव यांना लोकशिक्षक बाबा भारती काव्य प्रतिभा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तसेच कवी भरत दौंडकर यांना काव्य प्रतिभा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले वप्राध्यापक सचिन कांबळे यांना पाली भाषा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले दत्तात्रेय जगताप यांना काव्य प्रतिभा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले स्नेहबंधन पुरस्कार माननीय सुरेशचंद्र वारघडे यांना देण्यात आला त्याप्रसंगी ते




म्हणाले दुस-याच्या बापात मला माझा बाप दिसतो शब्दयोगी आदर्श गावचे सरपंच बुद्ध पुरुष पोपटराव पवार आहेत अष्टांग मार्गाने गावाचा शाश्वत उद्धार केला जगातले एकमेव गाव म्हणजे हिरवे बाजार आहे असा माझा दावा आहे असे प्रतिपादन केले कृषी भूषण उद्योगपती सुदाम भोरे म्हणाले आजचा दिवस योगायोग आहे आदर्शाचा वारसा असणारे गाव जगभर गाजत आहे झाडे लावावी संगोपन के झाडे लावून संगोपन केले पाहिजे हिरवे बाजार गावासारखे प्रत्येक गाव व्हावे गाव मोठे केले तर आपण मोठे होतो माणूस म्हणून जगायचे माणूस म्हणून मरायचे असे ते व्यक्त झाले

कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे ज्येष्ठ समाज सुधारक म्हणाले स्वप्न पेरणारा महामानव पोपटराव पवार आहेतघरामध्ये ग्रंथसंपदा असणे आणि घरामध्ये संविधान असल्याच पाहिजेततरच प्रत्येक गाव समृद्ध होईल समानतेच्या विचाराचे तत्त्वज्ञान मूर्तीत आहे तेअजिंठा वेरूळ लेणीत प्रामुख्याने आढळते शिक्षणाची जिद्द ठेवावी कलागुणांनी विचार निर्माण होईल आणि प्रत्येक माणूस महापुरुष नक्कीच होईल असे प्रतिपादन केले

डॉ श्रीपाल सबनीस म्हणाले तू खूप तिचे नायक शिल्पकार पोपटराव पवार उदय्यवादावर प्रेम करणारे आहेत कर्तुत्व आणि नेतृत्व सांभाळणे सुखाचे तत्त्वज्ञानगावच्या दुःखाची मुळे शोधणारे पोपटराव पवार आहेत दुःखमुक्तीचं गाव हिवरे बाजार असून गावाला गाव पण देणारे क्रांतिकारक नशाबंदी दारूबंदी व्यसनमुक्ती जलपुरुष माथा ते पायथा संकल्प राबवून गावचा विकास केला शेतक-यांसाठी यशवंतराव चव्हाण ट्रेनिंग सेंटर उभारले धाडसी युगपुरुष नंदी गावात डोळस माणूस कणाकणात दिसतो आहेकवी भरत दौंडकर यांच्या कवितेत बाप गायीसारखा असतो कवी दत्तात्रय जगताप तू फक्त बाई नाहीस एक संग्रहातील बाप कविता सादर केली हजरजबाबी निवेदक पत्रकार व्याख्याते रानकवी जगदीप वनशिव यांनी जगत जा बघत जा हा सामाजिक संदेश देऊन विद्यार्थ्यांना कवितेतून प्रेरणा दिली असे प्रतिपादन केले

या सुंदर सोहळ्याचे मृदुला आवाजात शीघ्रशैलीत सूत्रसंपादक कवयित्री सीमा गांधी यांनी केले कार्यक्रमास प्रदीप गांधलीकर अरुण गराडे विजय कांबळे राधाबाई वाघमारे प्रभाकर दाभाडे प्रभाकर वाघोले सविता इंगळेहे उपस्थित होते पुरस्कार सोहळ्याचे आभार श्रमश्री बाजीराव सातपुते यांनी मानले

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १० डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# विधानसभा अध्यक्षांकडून निष्पक्ष भूमिकेचे दर्शन, राहुल नार्वेकर यांचा मोठा निर्णय

## त्यांनी विरोधी पक्षाच्या चार सदस्यांना कामकाज सल्लागार समितीत समाविष्ट केले



विधानसभेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप आमदार राहुल नार्वेकर यांची आज बिनविरोध निवड झाली आहे. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निष्पक्ष भूमिकेचे दर्शन घडवले आहे. राहुल नार्वेकर यांनी विरोधी पक्षाकडे आवश्यक संख्या नसतानाही कामकाज सल्लागार समितीवर त्यांच्या सदस्यांची नेमणूक केली आहे. विधिमंडळाच्या कामकाज सल्लागार समितीवर १२ सदस्य असतात. किमान २२ सदस्य असलेल्या पक्षाचा एक सदस्य कामकाज सल्लागार समितीवर नेमला जातो. पण यावेळी विरोधकांकडे तितकी सदस्य संख्याही नाही. असं असताना विधानसभा अध्यक्षांनी सदस्य संख्या नसतानाही विरोधी पक्षांच्या ४ जणांची निमंत्रित सदस्य म्हणून नेमणूक केली आहे. विधानसभा अध्यक्षांनी विरोधी बाकावरील जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, सुनिल प्रभू, नाना पटोले यांची या समितीत नियुक्ती केली आहे. विधिमंडळाच्या कामकाज सल्लागार समितीची आज बैठक पार पडली. या बैठकीत येत्या १६ डिसेंबर ते २१ डिसेंबर या कालावधीत नागपुरात विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विरोधी पक्षातील जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड हेही उपस्थित होते.

सल्लागार समितीची आता कधी बैठक होणार? विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत पुढची बैठक कधी घ्ययाची? हे देखील ठरवण्यात आलं आहे. कामकाज सल्लागर समितीची हिवाळी अधिवेशनादरम्यान १८ डिसेंबरला बैठक होणार असल्याची माहिती आहे. विधिमंडळाचं सध्या २१ डिसेंबरपर्यंतचे कामकाज निश्चित करण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, विरोधकांकडून विरोधी पक्षनेत्यांसंदर्भात भूमिका बैठकीत मांडली गेली नसल्याची माहिती आहे. फक्त कामकाजावर बोलणं झाल्याची माहिती आहे.

# डॉ.मधुसूदन घाणेकर यांना विश्वगुरु उपाधि प्रदान

!!! पुणे :दि. डिसेंबर २०२४ भारतासह २० देशात स्वखर्चाने म ानवधर्म:सर्वश्रेष्ठ धर्म या प्रसारासाठी विश्वजोडो अभियानासह विनामूल्य चालता बोलता हिंडता फिरता असा म सबकुछ.मधुसूदन म हा विश्वविक्रम एकपात्री.कार्यक्रम करुन हजारो रसिकांना दिलासा दिला. डॉ.घाणेकर यांच्या या गौरवास्पद कामगिरीबद्दल डॉ.मधुसूदन घाणेकर गौरव समिती तर्फे डॉ.मधुसूदन घाणेकर यांना जाहिररित्या , ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ.न.म.जोशी यांच्या शुभहस्ते म विश्वगुरु म ही उपाधि प्रदान करण्यात आली. सदर उपाधि डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी वैश्विक शक्तिला प्रदान केली. ङ्ग दत्तसंप्रदाय, वारकरी संप्रदाय, भारतीय अध्यात्म, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय मजदूर संघ यांचे संस्कार घडल्यानेच सातत्याने विश्वजोडो अभियानाच्या माध्यमातून भेटेल त्या रसिकाला निरपेक्ष आनंद देण्याचे भाग्य मला मिळाले ङ्ग असे डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी सन्मानाला उत्तर देताना सांगितले. ङ्ग आनंदाचे वितरण करणारे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.म



धुसूदन घाणेकर होय. आयुष्यभर जो दुस–याला निरपेक्ष आनंद सातत्याने देत रहातो तोच खरा म विश्वगुरु म असतो.डॉ.घाणेकर हे म विश्वगुरु म चेच कार्य करीत आहेत, असे गौरवोदगार डॉ.न.म.जोशी यांनी उपाधि प्रदान करताना काढले. या प्रसंगी हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेचे विश्वस्त मिलिंद लेले , ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्या मंदा नाईक, आंतराष्ट्रीय कीर्तिच्या शीळवादक अनघा सावनूर आगाशे, भारतीय विचारधारा संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष भारती महाडिक , मधुरंग संस्थेच्या उपाध्यक्ष सौ.मेघना मधुसूदन घाणेकर आदि म ान्यवर उपस्थित होते. याच सोहळ्यात डॉ.घाणेकर संपादित विश्वविक्रमी डहाळी अनियतकालिकाचा ६०० वा अंक, डॉ.घाणेकर यांचा मधुउवाच हा विश्वविक्रमी ५०वा काव्यसंग्रह आणि हाहाहाहीहीहीहूहूहू व्यंगचित्र संग्रह याचे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. वर्ल्ड ग्रीन बीजच्या,अध्यक्ष सारिका सासवडे यांनी सूत्रसंचालन केले.डॉ.घाणेकर यांना प्रदान करण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन आणि प्रास्ताविक वसुधा इंटरनॅशनल संस्थेच्या अध्यक्ष वसुधा नाईक यांनी केले.स्वागत गीत मनीषा सराफ यांनी सादर केले. मिलिंद लेले, आघाडीच्या कवयित्री आणि निवेदिका ऋचा थत्ते, सौ.मेघना घाणेकर अनघा सावनूर आगाशे, तितिक्षा इंटरनॅशनलच्या संस्थापक –अध्यक्ष प्रिया दामले आदिंचीही भाषणे झाली. काव्यशिल्पच्या माजी अध्यक्ष अपर्णा आंबेडकर, महिला सन्मानच्या सचिव दीपाराणी गोसावी, युवा विश्वच्या सचिव सुचेता प्रभुदेसाई , मंदा नाईक, मधुकर्णिका सारिका सासवडे आदिंनी डॉ.घाणेकरांवर आधारीत स्वरचित कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात डॉ.मधुसूदन घाणेकर यांनी म सबकुछ मधुसूदन म ह्या एकपात्री कार्यक्रमाचा ८१, ००० वा प्रयोग सादर करुन उपस्थितांची मने जिंकली ! आभार प्रदर्शन वसुधा नाईक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष भागवत, माधुरी भागवत, योगेश हरणे , गौरव पुंडे, अजया मुळीक, मुकुंद भागवत आदिंनी विशेष योगदान दिले.

## ***निमंत्रण पत्रिका***




पलपब प्रकाशन अहमदाबाद, गुजरात द्वारा आयोजित काव्यशारदा राज्यस्तरीय साहित्य संमेलन व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा–या गुणवंतांना पुरस्कार वितरण सोहळा २०२४, दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी साहित्य क्षेत्रातील नामवंत मान्यवरांच्या हस्ते पार पडणार आहे . तसेच काव्य संमेलन ही प्रतिभावंत कवींच्या उपस्थित रंगणार, गुजरात राज्यात अहमदाबाद शहरात , या साहित्य संमेलनाची तयारी पलपब पब्लिकेशन संस्थेच्या सर्वेसर्वा सौ.लीना ताई पाटील व संस्थेच्या सर्व अध्यक्ष,सदस्यांनी जोरदार केली असून आपण साहित्यिकांनी उपस्थित राहावे.स्थळ – महाराष्ट्र समाज अहमदाबाद. वसंत चौक ,भद्रा,लाल दरवाजा अहमदाबाद पिन कोड ३८०००१

## रुई पिंपळा येथून कापूस भरलेला पिकअप चोरीला

वडवणी । सकाळी जानिंगला घेऊन जाण्यासाठी रात्री कापूस भरुन घरा समोर उभा केलेला पिकअप अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना रुई पिंपळा ( ता. वडवणी) येथे सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार देण्यात आली असून वडवणी पोलीस घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी पोहोचले आहेत. रुई पिंपळा येथील शेतकरी रावसाहेब आंधळे यांचा कापूस विक्रीसाठी जिनिंगला आज सकाळी घेऊन जाणार होते. यामुळे रविवारी रात्रीच गावातील शेख वाहेद गनी यांच्या पिकअप क्र. एम.एच. २७ एक्स ६०२१ मध्ये भरुन ठेवला होता. हा कापूस भरलेला पिकअप शेख वाहेद यांनी आपल्या घरासमोर



उभा केला होता. रविवार रात्री अज्ञात चोरट्यांनी कापसा सहित हा पिकअप मध्यरात्री अडीचच्या सुमारास चोरून नेला. हा प्रकार लक्षात येताच पिकअप मालक शेख वाहेद गनी यांनी पोलिसात धाव घेऊन तक्रार दाखल केली. तक्रार येताच वडवणी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. कापसासह वाहन चोरी झाल्याने वडवणी तालुक्यात शेतकऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# कणकवली येथील एसब.एमब.हायस्कुलच्या १९७६ एस.एस.सी.बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळा उत्साहात!

कणकवली (प्रतिनिधी–गुरुनाथ तिरपणकर)

वर्ग मित्र भेटले कीं, पहिले वर्गातील बेंच पार्टनर आठवतात. ती बेंच, केलेली मजा–मस्ती, मारामारी, खेळ या आठवणी जाग्या होतात. कणकवली येथील एस.एम.हायस्कूलच्या एसब.एसब.सी.१९७६ बॅचचे ३३ वर्षांनी २००९ मध्ये पहिले गेट–टुगेदर संपन्न झाले होते. अलिकडच्या काळात सतत चारपाच वर्षे गेट–टुगेदर होत आहे. मात्र यावर्षी एस.एम. हायस्कूलच्या एस.एस.सी. १९७६ चा तीन दिवसीय स्नेहमेळा नुकताच महाड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. माजी विद्यार्थी–विद्यार्थिनींनी आपापल्या कार्यक्षेत्रात सामाजिक बांधिलकी जपली. ४९ वर्षानंतरही शिक्षकांप्रेमी आदरयुक्त भीती संपादित केलेल्या ज्ञानाच्या आधारावर समाजात वावरताना ज्ञान प्रदान करणा–या त्या गुरुजनांना न विसरता ४९ वर्षानंतरही मोठे झाले, आजी–आजोबा झाले, तरीही प्रेम□वासल्य शिक्षकांप्रती नतमस्तक होत आहेत. कणकवली येथील एस.एम. हायस्कूलच्या एस.एस.सी १९७६ च्या या बॅचचे हे माजी विद्यार्थी–विद्यार्थींनी अभिमानास्पद वाटणा–या गुरुजनांच्या आदर्शनुसार शेती, व्यवसाय, वैद्यकिय क्षेत्र, शैक्षणिक, बॅकींग क्षेत्र, सामाजिक, औद्योगिक क्षेत्र, सरकारी, खाजगी आस्थापनावरुन सेवा निवृत्त होऊन स्नेहमेळाचा आनंद घेत आहेत. प्रत्येकाच्या शालेय जीवनातील आठवणी अविस्मरणीय असतात. मित्रांसोबत मिळुनमिसळुन केलेला अभ्यास, शिक्षकांचे विद्यार्थ्यांवरील असलेले प्रेम आणि वचक, हायस्कूल मधील क्रिडा स्पर्धा, स्नेहसंमेलन, शिक्षकांनी दिलेली शिक्षा अशा विविध आठवणींना उजाळा मिळाला.कर्तव्य आणि कृतज्ञता ही भारतीय संस्कृतीतील महत्वपूर्ण मुल्ये आहेत. कृतज्ञतेची जाणीव असल्यामुळे जुने मित्र–मैत्रिणी भेटल्यामुळे सर्वांच्याच चेह–यावरील आनंद ओसंडून वाहत होता.या तीन दिवसीय गेट–टुगेदर मध्ये महाड शहरातील दिवे आगार



येथील श्री सुवर्ण गणेश मंदिर येथील मुर्तीचे दर्शन घेतले.त्यानंतर दिवे आगार बीच वर संध्याकाळी फ ेरफटका मारला.दुस–या दिवशी रायगड रोप वेची सफर केली.रायगड च्या पायथ्यापासून ते रायगड किल्लयावर रोप वेने जाण्यासाठी फक्त चार मिनेटे लागतात.रोपवेने गडावर जाण्याचा हा क्षण सर्वांनाच रोमहर्षक असाच होता. रायगड किल्यावर मेहडंबरी, शिवाजी महाराजांचे प्रत्येक दालन, बाजारपेठ, तटबंदी, टकमक टोक, हिरकणी बुरुज, धान्य कोठार, महादेव मंदीर, अशी रायगडावरील प्रत्येक ठीकाणांवरील माहिती येथील गाईड ने सविस्तर पणे दिली. येथील शिवकालीन रायगड किल्लयाची गाईड माहिती सांगत असताना स्फ ुर्तीदायी रोमांच उभा रहात होता.सर्वांनीच रायगड रोप वेचा आनंद घेतला. त्यानंतर रात्रीच्या सत्रात ज्या माजी विद्यार्थी–विद्यार्थ्यींचा नोव्हेंबर–डिसेंबर मध्ये वाढदिवस होते ते एकत्रितरित्या केक कापून वाढदिवस साजरा केला.त्यानंतर बालाजी हॉलमध्ये संपन्न झालेल्या ४९ वर्षानंतर प्रथमच भेटलेले आमचे वर्गमित्र, सदाबहार हसमुख प्रसंन्न व्यक्तीमत्व सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ.संदिप कदम यांनी तर सर्वांनाच सुखद धक्का दिला, त्यांनी प्रास्ताविक तर केलेच,पण स्वतः सर्वांच्याच व्यक्तीमताची ओळख स्वतः डॉ.संदिप कदम यांनी नवर्षाची (२०२५) प्रत्येकाच्या नावाची आकर्षक डायरी व २०२५ चे कॅलेंडर देऊन यथोचित सत्कार केला.यावेळी प्रत्येकाने आपले मनोगत व्यक्त केले. तसेस एस.एम.हायस्कूलच्या एस.सी.सी१९७६ च्या स्नेहमेळ्याचे उत्कृष्ट शिस्तबद्ध करणारे माजी विद्यार्थी महाडचे उद्योजक उन्मेश राजेशिर्के व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.मधुरा राजेशिर्के यांनी स्वतःकडून ङ्गकुशावतीचा कोतवालङ्गहे डॉ.कुमार सिंगल (भा.पो.से.) यांच्या घटनेवरिल पुस्तक सर्वांना भेट दिले.या स्नेहमेळ्यासाठी उन्मेश राजेशिर्के व सौ.मधुरा राजेशिर्के यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच यावेळी कणकवलीतील उद्योजक माजी विद्यार्थी प्रसाद देसाई यांनीही सर्वांना काजुगर भेट दिले.इतरही विद्यार्थ्यांनी गोडधोड खाऊ देऊन तोंड गोड केले.तसेच पालीच्या गणपतीचेही दर्शन घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संदिप उत्कृष्टरित्या केले.आणि संजय पाध्ये,नंदु आळवे,प्रसाद देसाई यांनी सर्वांच्यावतीने आभार म ानले. वृंदाचे चिरजिंव नवनीत प्रभुझांन्टे याने तीन दिवसीय स्नेहमेळ्याची उत्कृष्ट फोटोग्राफी केली. कणकवली येथील एस.एम. हायस्कूलच्या एस.एस.सी.१९७६ च्या बॅचच्या स्नेहमेळ्यासाठी उन्मेश राजेशिर्के, सौ.मधुरा राजेशिर्के, संजय पाध्ये, प्रसाद देसाई,नंदु आळवे यांनी विशेष मेहनत घेतली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com